परिशिष्ट — अ

सन २०१७—१८ ची शिष्यवृत्ती/शिक्षण फी मिळण्यासाठी **बंधपत्र (Indemnity Bond)**

(शासननिर्णय क्र. इबीसी—२०१७/प्रक्र५२५/शिक्षण—दि.८.१२.२०१७ च्या अनुरोधाने)

## अ) विद्यार्थी व पालकांनी द्यावयाचे हमीपत्र/प्रतिज्ञापत्र

१) मी/आम्ही खाली सही करणार/करणारे प्रतिज्ञापन करतो की, शिष्यवृत्ती मिळण्याबाबतच्या अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत. अर्जात वरीलप्रमाणे दिलेली सर्व माहिती पूर्णपणे सत्य आहे. सदची माहिती खोटी अथवा अपुरी आढळल्यास भारतीय दंडविधानाप्रमाणे होणा—या दंडास/शिक्षेस मी/आम्ही पात्र आहे/आहोत. त्यापैकी कोणतीही माहिती व विनेदन चुकीचे आढळून आल्यास सक्षम प्राधिका—याने दिलेला निर्णय अंतिम असेल व तो माझ्यावर/आम्हावर बंधनकारक असेल अशी मी/आम्ही हमी देतो. जर शिष्यवृत्तीची रक्कम जास्तीची मिळाली तर मी/आम्ही परत करेन/करु अशी जास्तीची अथवा अन्य कारणांमुळे वसूल करण्यात येणारी रक्कम मी/आम्ही पूर्णपणे परत करण्याची हमी देतो. उत्पन्नाची व जातीची माहिती खोटी आढळल्यास माझे/माझे पाल्याचे विरुध्द होणा—या कारवाईस मी/आम्ही स्वत: जबाबदार राहू.

२) मी अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे मी सक्षम अधिका—याकडून/प्राधिका—याकडून प्राप्त केली असून ती कागदपत्रे खरी असून योग्य मार्गाने मिळविलेली आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार/दरुस्ती बदल केलेला नाही. ती खोटी अथवा नकली नाहीत हे मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो. अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे खोटी अथवा बनावट आढळल्यास त्यास मी/आम्ही पूर्णत: जबाबदार असून त्यासाठी भारतीय दंड विधान कायदा कलम १९९ व २०० नुसार लागू होणा—या शिक्षेस मी पात्र राहिन याची मला पूर्ण जाणीव आहे.

३) सन २०१७—२०१८ या वर्षाची शिक्षणशुल्क, परीक्षाशुल्क व इतर शुल्काची रक्कम बॅक खात्यात जमा होताच मी ती महाविद्यालयास सात दिवसांत जमा करुन रितसर पावती प्राप्त करुन घेण्याची माझी/आमची जबाबदारी असेल शुल्क महाविद्यालयास जमा न केल्याने भविष्यात उद्भवणा—या परिणामास मी/आम्ही वैयक्तिक जबाबदार असु असे प्रतिज्ञापूर्वक हमीपत्र/बंधपत्र मी/आम्ही सादर करीत आहोत.

ठिकाण:

दिनांक :

(अर्जदाराच्या वडीलांची/पालकाची सही व नांव) (अर्जदाराची सही व नांव)